ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १६ फेब्रुवारी, १९५५ | अंक ७

## विविध माहिती

**भारतीय रेल्वेच्या सामानाच्या चोऱ्या**—मुंबईतील उपनगराकडे जाणाऱ्या रेल्वे-गाड्यांच्या डब्यांची तपासणी करण्यासाठी एका ब्रिटिश कंपनीचा अधिकारी आला होता. एका डब्याची तपासणी करण्यासाठी तो आंत शिरला असतां डब्यांतील काढून नेण्यासारखें सर्व सामान त्याला चोरलेलें आढळलें. रेल्वे बोर्डानें असा अंदाज केला आहे कीं, भारतीय रेल्वेजच्या ५० लाख रुपये किंमतीच्या सामानाची दरवर्षी चोरी होते.

**भारताची अरबस्तानला मदत**—अरबस्तानांतील टोळधाडीच्या संकटाला तोंड देण्यासाठी भारतीय सरकारनें ३० तंत्रज्ञ अधिकाऱ्यांची रवानगी केली आहे. ह्या तंत्रज्ञांनीं आपली स्वतःची मोटार व इतर साहित्यहि बरोबर नेलें आहे. अरबस्तानांत वसंत ऋतूंत व हिंवाळ्यांत टोळांची उत्पत्ति होते व मग त्यांचे थवे भारतांत येतात.

**कोयनेवरील धरणाचें काम**—प. भारतामधील सर्वांत मोठी धरणाची योजना म्हणून कोयनेवरील संकल्पित धरण प्रसिद्ध आहे. धरणाच्या प्राथमिक कामाला आतां सुरवात झाली आहे. एका स्वीडिश कंपनीकडून सल्ला घेण्यांत येत आहे. धरणासाठी जागतिक बँकेकडून मोठ्या कर्जाची मागणी करण्यांत येईल. धरणाला ३३ कोटी रुपये खर्च येईल व त्यावर १,४४,००० किलोवॅट वीज उत्पन्न होईल.

**समाज-विकास योजनांचा अभ्यास**—भारतामधील समाज-विकास योजनांचा अभ्यास करण्यासाठी इराणच्या सरकारचे चार प्रतिनिधी भारतांत आले आहेत. त्यांनीं निलोखेडी येथील योजनेचें कामकाज पाहिलें असून आतां ते पंजाब व पेप्सु राज्यांतील योजनांचें काय तपशीलवार पहाणार आहेत.

**रशिआंतील शाळांत हिंदीचा अभ्यास**—रशिआंतील शाळांतून हिंदी आणि चिनी भाषांचा अभ्यास ऐच्छिक विषय म्हणून ठेवण्यांत आल्याचें समजतें. रशिआंतील शाळाकरी मुलांना इंग्लिश, फ्रेंच अगर जर्मन ह्यांपैकीं एक कोणती तरी भाषा ह्यापूर्वीच शिकावी लागत असे. रशिआंत ७५ भाषा आहेत, पण राष्ट्रीय भाषा म्हणून रशिअन मानली जाते.

**भारताविषयीं अनुबोध-पट**—नॅशनल ब्रॉडकास्टिंग कंपनी ह्या अमेरिकन कंपनीनें भारतासंबंधी एक अनुबोधपट काढण्याचें ठरविलें असून त्यासाठीं अमेरिकेचे भारतामधील माजी वकील मि. चेस्टर बौल्स ह्यांचें सहकार्य मागितलें आहे. हा माहिती-पट एक तासभर चालेल इतक्या लांबीचा करण्यांत येत असून तो येत्या ऑक्टोबरमध्यें अमेरिकेंत टेलिव्हिजननें दाखविण्यांत येईल.

**हैदराबाद राज्यांतील शिक्षकांचें वेतन**—हैदराबाद राज्याचे शिक्षणमंत्री, श्री. एकबोटे ह्यांनीं असा दावा केला आहे कीं राज्यांतील शिक्षकांना सर्वांत अधिक पगार देण्यांत येतो. राज्याच्या अंदाजपत्रकापैकी २० टक्के रक्कम शिक्षणावर खर्च केली जाते, अशीहि माहिती त्यांनीं सांगितली.

**प्राण्यांसाठीं फिरता दवाखाना**—पाटणा येथाल प्राणि-संरक्षक संस्थेला लंडन येथील प्राणिसंरक्षक संस्थेनें मोटारींवरील फिरत्या दवाखान्याची भेट दिली आहे. मोटार अर्पण करण्याचा समारंभ नुकताच पार पडला. ह्या मोटारीसाठीं लंडनमधील संस्थेनें २८,००० रुपये खर्च केले.

**सरकार-नियंत्रित विम्याचें कामकाज**—न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिआ ह्या दोन देशांतील सरकार-नियंत्रित विम्याचें कामकाज कसें चालतें त्याचा अभ्यास करण्यासाठीं भारतीय सरकारचे कंट्रोलर ऑफ इन्शुरन्स हे त्या देशांना गेले आहेत. कोलंबो योजनेंतील साह्यास अनुसरून ही भेट देण्यांत येत आहे.

**आनंद येथें दूध टिकविण्याची सोय**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या बालक-साह्य-निधीच्या मदतीनें आनंद येथील दुग्धालयांत दूध टिकविण्याची नवीन यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे. ह्या दुग्धालयांत हंगामाच्या वेळीं बरेंच दूध बाहेरून येतें; पण तें टिकविण्याची सोय नसल्यानें वायां जातें. नवीन यंत्रसामुग्रीसाठीं २,५०,००० डॉलर्सची रक्कम मंजूर झाली आहे.

**भोपाळ राज्यांत केरळमधील शेतकरी**—भोपाळ राज्यांत वसाहत करून राहण्यासाठीं त्रावणकोर-कोचीनमधील १०० शेतकरी कुटुंबांची निवड करण्यांत आली आहे. हीं कुटुंबें लवकरच भोपाळकडे रवाना होतील. त्यांच्याबरोबर त्रावणकोर-कोचीन सरकारचा एक शेतकरी अधिकारी जाणार आहे. वसाहतीचें काम मार्गी लागल्यावर तो परत जाईल.

**राजस्थानांतील वाचनालयें**—राजस्थान सरकारनें राज्यांत वाचनालयांचा प्रसार करण्यासाठीं ५,२०,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. सरकारनें आखलेल्या योजनेप्रमाणें, राज्याचें शिक्षण-खातें एक मध्यवर्ती वाचनालय ५ डिव्हिजनल वाचनालयें आणि २५ जिल्हा-वाचनालयें काढणार आहे. शैक्षणिक संस्थांतील वाचनालयांची सुधारणा करण्याचें कामहि खात्यातर्फे होणार आहे.

**मुलांसाठीं पोहण्याची सोय**—दिल्ली येथें १४ वर्षांखालील मुलांची पोहण्याची सोय करण्यासाठीं एक तलाव बांधण्यांत येणार आहे. तलाव ८० फूट लांब व ३० फूट रुंद राहील. तलावाची खोली २ फुटांपासून ६ फुटांपर्यंत ठेवण्यांत येणार आहे. त्यासाठीं सुमारें ७५, हजार रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

### मलाया व हिंद ह्यांचा व्यापार

मलायांतील भारतीय व्यापारी प्रतिनिधीनें १९५२ सालअखेर जो अहवाल केला होता तो प्रसिद्ध करण्यांत आला आहे अहवालांत असें सुचविण्यांत आलें आहे कीं भारतीय व्यापाऱ्यांनीं सिंगापूरला आणि त्या बंदराच्या द्वारें आग्नेय आशिआंतील देशांना अधिक प्रमाणांत निर्यात करावी. भारतामधून कापडासारख्या वस्तू पूर्वीपासूनच ह्या भागाला निर्यात होत आहेत. पण ह्या वस्तूंशिवाय पक्क्या मालाचीहि निर्यात करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे. अहवालांत पुढें असें म्हटलें आहे, कीं भारतीय व्यापाऱ्यांनीं आपले प्रयत्न अधिक कसोशीनें करणें आवश्यक आहे. कारण, जपान आपला माल आतां पुन्हां पाठवूं लागला आहे. कापड, सायकलींचे सुटे भाग, घड्याळें, शिवण्याचीं यंत्रें, इत्यादि विविध प्रकारचा जपानी माल आग्नेय आशिआंत येऊं लागला आहे. गेल्या कांहीं दिवसांत थोडाबहुत जर्मन मालहि इकडील बाजारपेठांत दिसूं लागला आहे. त्याशिवाय इतर युरोपिअन देशहि बाजारपेठेच्या स्पर्धेत भाग घेऊं लागले आहेत. १९५२ सालीं भारतानें मलायाला ८·३ कोटी डॉलर्स किंमतीचें सूत आणि इतर पक्का माल निर्यात केला. लोकरीच्या वस्तूंच्या निर्यातींत १९५२ सालीं ७२·२ टक्क्यांनीं घट झालेली दिसून येते. १९५१ च्या मानानें १९५२ सालीं भारतामधून मलायांत आलेल्या मालाची निर्यात निम्यानें झाली. तथापि, मलायाला कापड निर्यात करणाऱ्या देशांत भारतानें १९५२ सालींहि पहिला क्रमांक मिळविला. मलायाच्या मानानें भारत औद्योगिक दृष्ट्या पुढारलेला असल्यामुळें आणि युरोपिअन देशांच्या मानानें तो अधिक जवळ असल्यामुळें अहवालांत केलेल्या सूचना चिंतनीय वाटतात.


---

### काश्मीरला जाणारे हौशी प्रवासी

काश्मीर सरकारचे विकास-खात्याचे मंत्री श्री. शामलाल सराफ कांहीं दिवसापूर्वी मुंबईला आले होते. काश्मीरला जाणाऱ्या हौशी प्रवाशांच्या सोयी अधिक चांगल्या करण्यासाठी काय करतां येईल हें पहाण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यांच्या चार दिवसांच्या मुक्कामांत त्यांनीं मुंबई सरकारच्या अधिकाऱ्यांशीं आणि शहरांतील प्रवास-विषयक संस्थांशीं ह्या दृष्टीनें वाटाघाटी केल्या. ह्या विषयासंबंधीं बोलतांना श्री. सराफ म्हणाले कीं हौशी प्रवाशांपासून होणारें उत्पन्न काश्मीरच्या आर्थिक स्थितीच्या दृष्टीनें एक महत्त्वाची बाब आहे व होती म्हणून ह्या व्यवसायांत झालेली वाढ काश्मीरच्या हिताचीच असते. काश्मीरला येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येंत दरवर्षीं वाढ होत आहे. गेल्या वर्षीं तर प्रवाशांचा हंगाम फारच चांगला झाला. युद्धापूर्वी जितके प्रवासी दरवर्षीं काश्मीरला येत असत, तितके आतां जवळ जवळ येऊं लागलें आहेत. काश्मीरचा आर्थिक विकास करण्याच्या आमच्या प्रयत्नांत प्रवासी राज्यांत करीत असलेल्या खर्चाची फार चांगली मदत होते. गेल्या वर्षीं काश्मीरला आलेल्या प्रवाशांची संख्या ३५,००० पर्यंत जाऊन पोंचली. यंदाच्या हंगामांत त्यांची संख्या आणखी बऱ्याच हजारांनीं वाढेल असा अंदाज आहे. मुंबई सरकार आमच्याशीं ह्या बाबतींत जें सहकार्य करीत आहे त्याबद्दल त्याचे आभार मानणें जरूर आहे. अशा सहकार्याशिवाय ह्या बाबतींत काश्मीरला जो पल्ला गांठतां आला तो गांठणें अशक्य झालें असतें. जगांतील पुढारलेलीं राष्ट्रें सुद्धां परकीय प्रवाशांना आपल्या देशांत येण्यास उत्तेजन देतात हें लक्षांत घेतलें, तर काश्मीरच्या प्रयत्नांचें महत्त्व कळतें.


किर्लोस्कर

'कल्याण' पॉवर शेंगायंत्र



हें यंत्र चालविण्यास ६/८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दरेक तासास ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जाते.

याशिवाय कल्याण हात आणि पॉवर शेंगायंत्र आणि कॉटेज शेंगायंत्र हीं लहान यंत्रें मिळतात. गरजेनुरूप आणि पसंतीनुरूप निवड करा.

—सविस्तर माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु लि.

किर्लोस्करवाडी, द. सातारा.



दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. कं. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. व. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १६ फेब्रुवारी, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## समाजवादी आर्थिक धोरण

२८ फेब्रुवारीला सादर होणाऱ्या भारत सरकारच्या अंदाजपत्रकांत करविषयक महत्त्वाचे फेरबदल असतील ही गोष्ट अधिकृत रीत्या स्पष्ट झाली आहे. याच बरोबर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या खर्चाची जबाबदारी पार पाडण्याची दृष्टि आतांपासून ठेवावी लागणार आहे. जणूं कांहीं यंदा सादर होणाऱ्या अंदाजपत्रकावर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची सांवली पडलेली असणार असें म्हणावयास हरकत नाहीं. राज्य सरकारांना पैसा उभारण्याची जबाबदारी जास्त प्रमाणांत स्वीकारावी लागणार आहे. याच वेळीं लोकसभेनें व आवडी येथें भरलेल्या काँग्रेसनें समाजवादी अर्थरचना निर्माण करण्याचा ठराव मंजूर केला आहे ही गोष्टहि अर्थपूर्ण समजली पाहिजे. समाजवादी आर्थिक धोरणाबद्दल सर्व ठिकाणीं पुष्कळच चर्चा झाली आहे, व आज विशेष कुतूहलाची गोष्ट म्हणजे ही समाजवादी रचना कशी निर्माण केली जाते याबद्दलची आहे. भारताच्या विशिष्ट परिस्थितीच्या दृष्टीनें व्यवहाराच्या कसोटीवर आपली समाजवादी अर्थरचना उभारली जाईल व या बाबतींत केवळ पुस्तकी तत्त्वज्ञानावर किंवा विचारसरणीवर भर देण्यांत मुळींच अर्थ नाहीं, ही गोष्ट पंडित नेहरूंनीं आपल्या भाषणांतून जोरदार रीतीनें स्पष्ट केली आहे. खासगी क्षेत्र व सरकारी मालकीचें किंवा सरकारी नियंत्रणाखालील उद्योगधंद्यांचें क्षेत्र यामध्येंहि विरोध असण्याचें मुळींच कारण नाहीं असें मत व्यक्त करण्यांत आलेंच आहे.

राष्ट्रीयकरणाचें पाऊल पुढें पडत गेलें तरीहि खासगी क्षेत्रांतील कारखानदारांनीं स्वतःच्या क्षेत्रांत आपण होऊन पुढें आलें पाहिजे असा खुलासा नुकतांच एका व्यापारी संघटनेपुढें भाषण करतांना अर्थमंत्र्यांनीं केला आहे. खासगी व सरकारी नियंत्रणाखालील उद्योगधंद्यांमध्यें सहकार्य राहाण्यावर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें यश अवलंबून दिसतें. समाजवादी आर्थिक धोरणाबद्दल श्री. बिर्लासारख्या उद्योगपतींनीं समाधान व्यक्त केलें आहे, ही गोष्टहि स्वागतार्ह समजली पाहिजे. अर्थात् कांहींनीं समाजवादी धोरणाबद्दल असमाधान व्यक्त केलें आहे. नियोजनमंडळानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेबद्दल भारतांतील प्रमुख वीस अर्थशास्त्रज्ञांचा सल्ला घेण्याचें ठरविलें आहे. मुंबईच्या स्कूल ऑफ एकॉनॉमिक्सच्या संमेलनप्रसंगीं बोलतांना उद्योगमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांनीं सरकारचें आर्थिक धोरण प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेलें कसें आहे, याची चर्चा केली. अर्थशास्त्रज्ञांनीं मानवी मन व सभोंवतालची परिस्थिति या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत असेंहि त्यांनीं सांगितलें. याप्रमाणें अलिकडे एक-दोन महिने भारत सरकारच्या प्रमुख जागांवरील मंत्र्यांचीं भाषणें पाहिलीं असतां त्यांतून ध्वनी असा निघतो कीं, खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र यांच्यामध्यें एकवाक्यता नांदली पाहिजे व आर्थिक क्षेत्रांतील धोरण शक्य तितकें व्यावहारिक अनुभवावर आधारलें जाईल. समाजवादी आर्थिक धोरणाच्या दृष्टीनें व्यवहार करण्याचें सरकारी धोरण स्पष्टपणें दिसून येतें.

खासगी मालमत्ता, संमिश्र अर्थव्यवस्था, सरकारी मालकीचे उद्योगधंदे, सरकारी नियंत्रणें असलेले उद्योगधंदे व आवश्यक अशा सर्व ठिकाणीं सरकारी कायद्यांचीं बंधनें, या गोष्टी भारताच्या अर्थव्यवस्थेंत विखुरलेल्या आढळून येतच आहेत व याच्या पुढील काळांत या दृष्टीनें जास्त प्रमाणांत सरकारी धोरणाचीं चक्रें हालविलीं जातील, हें स्पष्ट दिसत आहे.

आजच्या काळांत समाजवादी आर्थिक धोरण कृतींत आणण्याबद्दल ज्या सूचक गोष्टी दिसून येनात त्याबद्दल मतभेद असण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. परंतु या धोरणाचें यश हें सरतेशेवटीं ज्या ज्या व्यक्तींचा या धोरणाशीं संबंध येत असेल त्या प्रत्येकानें आपलें कार्य मनोभावानें करण्यावर अवलंबून आहे. यासाठी ज्याप्रमाणें सरकारी यंत्रणा कार्यक्षम पाहिजे त्याचप्रमाणें कामगार, शेत करणारा, खासगी क्षेत्रांतील कारखानदार, व्यापारी व इतर स्वतंत्र व्यवसायांतील लोक, या प्रत्येकानेंहि कार्यतत्पर राहून संपत्तीच्या उत्पादनांतील आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे.

---

### पाकिस्तानची आर्थिक प्रगति

पाकिस्तान सरकारनें आपल्या आर्थिक प्रगतीचा अधिकृत अहवाल प्रसिद्ध केला आहे. पाकिस्तानची निर्मिति झाल्यानंतर त्या देशांतील जनतेला आपली आर्थिक भरभराट होईल असें वाटलें होतें. परंतु त्यावेळच्या राजकीय आणि आर्थिक परिस्थितीचा विचार करतां हें वाटणें केवळ श्रद्धेचा भाग होता असे अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. दुसरें महायुद्ध आणि त्याचे परिणाम ह्यांचा पाकिस्तानच्या प्रांतांवर फाळणीपूर्वीपासूनच आर्थिक प्रभाव पडूं लागला होता. औद्योगिक दृष्ट्या झालेली आबाळ आणि मोडकळीस आलेलीं दळणवळणाचीं साधनें ह्यांच्यामुळें पाकिस्तानला फार आर्थिक त्रास सोसावा लागला इकडेहि लक्ष वेधण्यांत आलें आहे. पाकिस्तान अस्तित्वांत आल्यानंतर दोन वर्षांनीं आर्थिक परिस्थिति थोडीशी सुधारली. १९४८–४९ सालीं मध्यवर्ती सरकारचें उत्पन्न ६६·८ कोटी रुपये होतें तें पुढील वर्षी ८८·५ कोटी रुपये झालें. १९४८–४९ सालीं विकास-योजनांवर पाकिस्तान सरकारनें ४९·२ कोटी रुपये खर्च केले होते. त्याच्या पुढील वर्षी सरकारला १०५·७ कोटी रुपये खर्च करतां आले. सरकारनें राज्याच्या आर्थिक विकासासाठीं ६ वर्षांचा कार्यक्रम आंखला होता. त्यावर २,६०० कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज होता. पण प्रत्यक्ष अनुभवानें ही रक्कम कमी पडल्याचें दिसून आलें. १९५२ च्या मध्याच्या सुमाराला जी मंदी आली, तीमुळें षड्वार्षिक कार्यक्रमाच्या पुढील तीन वर्षांवर वाईट परिणाम झाला. १९५१–५२ सालीं मध्यवर्ती सरकारचें उत्पन्न १४४·९७ कोटी रुपये होतें तें १९५२–५३ सालीं १२८·६ कोटी रुपयांवर आलें.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

अहवालाचे वर्षी सर्व खर्च भागून व नित्याच्या व आवश्यक त्या तरतुदी करून बँकेस तिच्या व्यवहारांत नक्त नफा रु. ३,२४,७२१–२–४ इतका झाला असल्याचें दिसून येईल. त्यामध्यें गेल्या वर्षाची बाकी रु. ३६,२२७–१२–४ जमा केल्यानंतर एकंदर रु. ३,६०,९४८–१४–८ इतकी रक्कम वांटण्याकरितां हातीं राहते. अपेलेट ट्रिब्यूनलच्या अवॉर्डवरील सरकारी हुकुमानुसार करावयाच्या नोकरवर्गाच्या पगार, ग्रॅच्युइटी, वगैरे बाबतच्या अॅडजेस्टमेंटस् त्यांच्याच संमतीनुसार राजाध्यक्ष कमिशनचा रिपोर्ट प्रगट होईपर्यंत तहकूब ठेवल्या आहेत.

वरील नफ्याच्या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें होईल:—

| | | |
|---|---|---|
| रिझर्व्ह फंडांत जमा करणें. (सदर फंड व कॉटिंजन्सी फंड मिळून गंगाजळी आतां रु. ७,७५,००० होईल) | रु. | ७५,०००—०—० |
| चालू वर्षाच्या इन्कमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी तरतूद | रु. | १,७०,०००—०—० |
| ५ टक्के करमाफ डिव्हिडंड | रु. | ८०,०००—०—० |
| ही रक्कम पुढील वर्षाच्या नफ्यांत मिळविली जाईल | रु. | ३५,९४८–१४—८ |
| | रु. | ३,६०,९४८–१४—८ |

अहवालाचे वर्षी बँकेचे व्यवहार समाधानकारक झाले. ठेवींचें प्रमाण पूर्वीप्रमाणेंच वाढतें आहे. स्वाभाविकच सरकारी कर्ज-रोख्यांतील गुंतवणूकही प्रमाणतः वाढली असून त्यामुळें बँकेच्या भांडवलाच्या लिक्विडिटीचें प्रमाण चांगलें राहिलें आहे. गुंतवणुकीतील रोख्यांची किंमत ही त्यांच्या परतफेडीच्या रकमेइतकी किंवा त्याहूनहि कमी आहे.

अहवालाचे वर्षी बांठिया बँकेच्या संचालकांनीं त्या बँकेचीं कांहीं देणीं व कांहीं येणीं ह्या बँकेकडे घेण्याबद्दल एक सूचना विचारार्थ मांडली. तेव्हां त्या बँकेचे हिशेब स्वतंत्र हिशेब-तपासनीसाकडून तपासून घेतले व त्याचा विचार करून त्यांची सूचना मान्य करण्याचें ठरलें. रिझर्व्ह बँकेची संमति मिळाल्या-नंतर ( व आवश्यक त्या तांत्रिक बाबी पार पाडल्यानंतर ) त्या बँकेच्या कांहीं ठेवी व कांहीं येणीं हीं ७ ऑक्टोबर, १९५४ ला या बँकेच्या हिशोबांत समाविष्ट करून घेण्यांत आलीं, व बांठिया बँकेच्या शाखा असलेल्या सहा गांवीं महाराष्ट्र बँकेच्या नवीन शाखा उघडण्यांत आल्या. या सर्व नवीन शाखांच्या ठिकाणीं जनतेचा चांगलाच पाठिंबा मिळत आहे. या नवीन शाखा धरून आतां एकूण २८ शाखा झाल्या आहेत. नवीन शाखांसह सर्व शाखांच्या ठिकाणचे व्यवहार समाधानकारकपणें चालले आहेत.

### बँकेचा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | १६,००,००० | कॅश, बँकांत | ५५,४५,७०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७,००,००० | कॉलमनी | १०,००,००० |
| ठेवी | ४,११,२८,००० | इनव्हेस्टमेंटस | १,६३,०५,००० |
| बिलें | २०,१५,००० | कर्जें | १,९८,४५,००० |
| नफा | ३,२४,७०० | बिलें | २०,१५,००० |
| | ४,६८,७५,७०० | | ४,६८,७५,७०० |

**भोपाळ राज्यांतील विकास-योजना**—१९५६ अखेर पुऱ्या होणाऱ्या पांच वर्षांच्या कालांत भोपाळ राज्यांत चालू असणाऱ्या विकास-योजनांवर सुमारें १२ कोटी रुपये खर्च होतील. ह्या रकमेंत भोपाळ राज्यानें पंचवार्षिक योजनेवर खर्च करण्यासाठी ठरविलेली ५ कोटींची रक्कम आहे. भोपाळ राज्य सरकार प्रथम ३५० लाख रुपयेच खर्च करणार होतें.


# NOTICE

## BHOR STATE BANK Ltd., BHOR

Notice is hereby given that the 11th Ordinary General Meeting of the Shareholders of the Bhor State Bank Ltd. will be held at 361–62 Budhwar Peth Poona City at 4 P. M. (S. T.) on Saturday **the 12th March 1955 to (1) receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended 31st Dec. 1954, (2) to elect Directors in place of retiring Directors who are eligible for re-election, (3) to appoint Auditors and fix their remuneration, (4) to transact such other business that may be allowed by the Chairman.**

Poona,
3rd Feb. 1955

By Order of the Board,
**N. V. Pandav,**
*Manager.*

दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.
स्थापना : १९३५



भांडवल
**वसूल भांडवल व गंगाजळी रु. २३,००,०००**
**खेळतें भांडवल रु. ४॥ कोटींवर**

—संचालक मंडळ—

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष)
श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे
श्री. न. ग. पवार
श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो पदमजी
श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. भा. म. गुप्ते

मुख्य कचेरीः–
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

**चिं. वि. जोग,**
मॅनेजर.

## कण आणि क्षण

(लेखक: श्री. वा. काळे, दुर्गाधिवास, पुणें ४. किं. २॥ रु.)

साध्याहि विषयांत किती मोठा आशय असूं शकतो, हें ह्या पुस्तकाच्या अवलोकनानें समजतें. "अर्थ" पत्राचा संपादक मोठा रुक्ष असेल अशी कोणाची समजूत असेल, तर ती हें पुस्तक वाचून बदलेल आणि त्याच्या लक्षांत येईल, कीं तो मोठा रसिक आणि चोखंदळ आहे. लोभी आणि कंजूष माणसाच्या वृत्तीनें कण आणि क्षण गोळा करीत बसलें, तर Penny wise and Pound foolish ही म्हण सुद्धां सार्थ होऊं शकेल. पण ह्या लेखकानें मधुमक्षिकेच्या वृत्तीनें कण आणि क्षण यांचें महत्त्व पटवून दिलें आहे. सांसारिकांना हें पुस्तक म्हणजे एक मोठीच देणगी आहे. मराठी जगांत पुस्तकाची दुसरी आवृत्ति एका वर्षाच्या अवधींत निघणें हेंहि लोकप्रियतेचें मोठेंच गमक मानलें पाहिजे. अतिशय घरगुती भाषेंत लिहिलेल्या या उपयुक्त आणि सुंदर पुस्तकाबद्दल लेखकाचे आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतों.

—वाङ्मय शोभा, डिसेंबर, १९५४.

## विड्यांचे कारखाने हे "कारखाने" आहेत

### हायकोर्टाचा निर्णय

१९४८ चा फॅक्टरीज् ॲक्ट विड्यांच्या कारखान्यांना लागू करण्याबाबत न्यायाधीश श्री. बावडेकर यांनीं १९५२ च्या ६८५ नं. च्या क्रिमिनल रिव्हिजन अर्जाबाबत निर्णय देतांना पुढीलप्रमाणें मत व्यक्त केलें होतें. त्यांचें मत असें होतें कीं, ज्या विडीकामगारांना कामाप्रमाणें मोबदला देण्यांत येतो आणि ज्यांना विड्या तयार करण्याचें साहित्य घरीं नेतां येतें अशा कामगारांच्या बाबतींत, नोकरीचा करार नसतो. म्हणजे, कारखान्याचे मालक व कामगार यांच्यामध्यें मालक व नोकर असें नातें नसतें. तेव्हां विड्यांच्या कारखान्याचे मालक आणि विडी-कामगार यांच्यामध्यें मालक-नोकराचें नातें नसल्यामुळें विडी-कामगार हे फॅक्टरीज् ॲक्टच्या २ (१) या कलमानुसार नोकरीवर आहेत असें म्हणतां येणार नाहीं; आणि म्हणून अर्जांत उल्लेखिलेला कारखाना हा कायद्याच्या २ (एम्) ह्या कलमानुसार कारखाना आहे असें समजतां येणार नाहीं.

या निर्णयाविरुद्ध सरकारनें हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचपुढें नुकतेंच अपील केलें होतें. त्या अपिलांत १९४८ च्या फॅक्टरीज ॲक्टाच्या २ (१) या कलमांत "नोकरीवर" (एम्प्लॉईड) असा शब्द वापरण्यांत आला आहे. त्यांत मालक-नोकराचें नातें अभिप्रेत नाहीं आणि कामाप्रमाणें ज्यांना मोबदला देण्यांत येतो अशा विडी-कामगारांना कायद्याखालीं "कामगार" असें संबोधितां येईल, असें म्हणणें राज्य सरकारनें मांडलें होतें. हायकोर्टानें १७ सप्टेंबर १९५४ रोजीं दिलेल्या निकालांत सरकारच्या म्हणण्याला मान्यता दिली आहे.

म्हणून, अपिलांत उल्लेखिलेले विड्यांचे कारखाने हे फॅक्टरीज् ॲक्टाच्या २ (एम्) या कलमानुसार "कारखाने" आहेत असा निकाल देण्यांत आला.

---

प. जर्मनीचें व्यापारी मंडळ—प जर्मन सरकार आपल्या व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ पुढील महिन्यांत भारत, पाकिस्तान व सिलोन ह्या देशांच्या दौऱ्यावर धाडणार आहे. भारत, सिलोन व पाकिस्तान ह्या देशांशीं असलेल्या व्यापाराची वृद्धि कशी करतां येईल, तें पाहण्याचा मंडळाचा हेतु आहे.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, दौंड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, इचलकरंजी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

## मरणापूर्वी आपली इस्टेट बक्षिस करून दिल्यास संपत्ति–कर टळेल काय ?

( श्री. म. न. चांदुरकर, ॲडव्होकेट, नागपूर )

संपत्ति–कराचा कायदा अंमलांत आल्यामुळें त्या करापासून बचत कशी करतां येईल हा प्रश्न सर्व श्रीमंतवर्गासमोर उभा झाला आहे. इंग्लंड, अमेरिका, इत्यादि संपत्ति–कर अंमलांत असलेल्या देशांमध्यें इस्टेटीचा कांहीं भाग जिवंतपणीं बक्षिस करून देण्याच्या रीतीनें थोड्याबहुत प्रमाणांत लोक संपत्ति–कर टाळण्यांत यशस्वी झाले आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत देखील सर्वसामान्य मनुष्याची अशी कल्पना झालेली दिसते कीं, आपल्या जिवंतपणीं आपण आपली इस्टेट बक्षिस करून तिची विल्हेवाट लावल्यास संपत्ति–कर द्यावा लागणार नाहीं. कांहीं प्रमाणांत ही समजूत बरोबर आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु या सर्व परिस्थितीचा विचार विधिमंडळानें अगोदरच केला आहे आणि तशी तरतूदहि अगोदरच कायद्यांत केली आहे. त्या दृष्टीने या कायद्यांत कलम ९ आणि १० टाकलें आहे.

संपत्ति–कराच्या कायद्यामध्यें कालाच्या दृष्टीनें बक्षिसाचे ठळकपणें दोन प्रकार केले आहेत:—(१) मरणापूर्वी दोन वर्षांच्या आंत करून दिलेलें बक्षिस आणि (२) मरणापूर्वी दोन किंवा जास्त वर्षांपूर्वी केलेलें बक्षिस. पहिल्या प्रकारच्या बक्षिसाचा विचार कलम ९ मध्यें केला आहे. दुसऱ्या प्रकारासंबंधी माहिती कलम १० मध्यें दिली आहे.

कलम ९ अनुसार मृत व्यक्तीनें आपल्या मरणकालापूर्वी दोन वर्षांचे आंत जर कोणत्याहि इस्टेटीची बक्षिस करून विल्हेवाट लावली असेल तर ती इस्टेट त्याच्या मरतेसमयीं वारसांकडे गेली असें समजली जाईल व त्या इस्टेटीवर संपत्ति–कर बसेल. सार्वजनिक धर्मार्थ कामाकरितां केलेल्या दानाच्या बाबतींत ही मुदत सहा महिने राहील.

या कलमामध्यें बक्षिस हा शब्द सर्वसामान्य अर्थानेंच वापरला आहे. कोणताहि स्थावर किंवा जंगम माल विनामूल्य कोणत्याहि व्यक्तीच्या स्वाधीन करण्याच्या व्यवहारास बक्षिस म्हणतात. अशा प्रकारें केलेलें दान दात्याच्या जिवंतपणींच स्वीकारलें जावयास पाहिजे. मिळालेलें दान प्रतिग्रहित्याने (Donee) स्वीकारण्यापूर्वीच जर दाता मरण पावला, तर तें दान अपूर्ण राहील आणि बक्षिसाची क्रिया पूर्ण झाली नाहीं, असें समजलें जाईल व तें बक्षिस कायदेशीर ठरणार नाहीं. स्थावर मालाचें बक्षिस करण्याकरितां लेखी दस्तऐवजाची आवश्यकता असते, आणि तो दस्तऐवज रजिस्टर व्हावयास पाहिजे. जंगम मालाचें बक्षिस मात्र नुसतें त्या मालाचें दान करून करतां येतें.

मुसलमानी कायद्याप्रमाणें स्थावर किंवा जंगम मालाचें बक्षिस करण्याकरितां कोणत्याहि लेखी दस्तऐवजाची आवश्यकता नाहीं. दात्यानें बक्षिस दिल्याची घोषणा करून ती वस्तु प्रतिग्रहिताच्या ताब्यांत दिल्यानंतर बक्षिस स्वीकारल्यावर मुसलमानी कायद्याप्रमाणें बक्षिस देण्याची क्रिया पूर्ण होते. अर्थातच, एखाद्या व्यवहारास बक्षिस म्हणावें किंवा नाहीं हें त्या व्यवहाराच्या स्वरुपावर अवलंबून राहील.

आतां आपण असें पाहूं कीं, वर सांगितलेल्या कोणत्याहि रीतीनें जर दात्यानें एखादें दान आपल्या मरणापूर्वी दोन वर्षांचे आंत केलें तर त्यावर संपत्ति–कर बसेल काय ? दोन वर्षांच्या मुदतीच्या अगोदर जर प्रतिग्रहित्यानें बक्षिस मिळालेल्या इस्टेटीचा ताबा घेऊन त्याचा संपूर्ण उपभोग घ्यावयास सुरुवात केली नसेल तर बक्षिस केलेल्या इस्टेटीचा समावेश संपत्ति–कर बसवितांना एकूण इस्टेटींत करण्यांत येईल. मरणापूर्वी केलेलें बक्षिस कर टाळण्याच्या हेतूनें केलें आहे अशी शंका उत्पन्न होण्याची शक्यता असल्यामुळें त्या बक्षिसाला खरेपणा येण्याकरितां आणि बक्षिस करण्यांत अयोग्य हेतु नाहीं हें सिद्ध होण्याकरितां कायद्यानें कमींत कमी दोन वर्षें ही मुदत टाकली आहे. ती मुदत संपल्यानंतरहि जर बक्षिस दिलेली मालमत्ता प्रतिग्रहित्याच्या ताब्यांत असेल आणि तोच त्याचा संपूर्ण उपभोग घेत असेल तर बक्षिसाच्या खरेपणाबद्दलची खात्री अधिकाऱ्यांना करून देणें कठीण होणार नाहीं. तात्पर्य असें कीं, मरणसमयापूर्वी दोन वर्षांच्या आंत इस्टेटींतील भाग बक्षिस देऊन केलेली विल्हेवाट संपत्ति–कराच्या कायद्याच्या दृष्टीनें न झाल्यासारखी आहे आणि त्या विल्हेवाटींतील इस्टेटीचा समावेश संपत्ति–कराचा हिशेब करतांना एकूण इस्टेटींत करण्यांत येईल. उदाहरणार्थ—

(१) अला ब जवळून रु. ५,००० घेणें आहेत. अ स्वखुशीनें तें कर्ज बला सोडून देतो. अनें बला रु. ५,००० बक्षिस दिले असें समजलें जाईल आणि कर्ज सोडून देण्याच्या दिवसापासून दोन वर्षांच्या आंत जर अ मरण पावला तर कलम ९ प्रमाणें या ५,००० रुपयांवर संपत्ति–कराची आकारणी होईल.

(२) बला कजवळून रु. ५००० घेणें आहेत. अ स्वखुशीनें रु. ५,००० बला देतो व कला बच्या कर्जातून मुक्त करतो. अनें कला रु. ५,००० बक्षिस दिले असें समजलें जाईल. जर अ त्या. दिवसापासून दोन वर्षांच्या आंत मरण पावला तर ५,००० रुपयांवर संपत्ति–कर आकारण्यांत येईल.

(३) अनें मृत्युपत्राप्रमाणें बला रु. ५,००० दिले व बाकी इस्टेट कला दिली. अनें रु. ५,००० वर हक्क दाखविला नाहीं आणि म्हणून ती रक्कम कला मिळते. बनें कला ती रक्कम बक्षिस दिली असें समजलें जाईल. जर हक्क सोडण्याच्या तारखेपासून दोन वर्षांतच ब मरण पावला तर या रकमेवर कर आकारण्यांत येईल.

### बक्षिस दिलेल्या जायदादीची किंमत कशी ठरविली जाईल ?

कलम ९ प्रमाणें मरणापूर्वी दोन वर्षांच्या आंत बक्षिस करून दिलेली इस्टेट वारसांकडे दात्याच्या मरतेसमयीं जात असल्यामुळें कर बसविण्याकरितां त्या इस्टेटीची किंमत कशी ठरवावी हा प्रश्न उद्भवतो. किंमत दोन प्रकारें ठरविली जाऊं शकते. (१) प्रतिग्रहित्यानें ज्या वेळेस दान घेतलें त्यावेळेस त्या मालमत्तेची असलेली किंमत आणि (२) दात्याच्या मृत्युसमयीं असलेली मालमत्तेची किंमत.

संपत्ति–कराच्या कायद्याच्या दृष्टीनें दात्याच्या मृत्युकालाच्या वेळीं इस्टेट वारसांकडे जात असल्यामुळें बक्षिस करून दिलेल्या इस्टेटीची त्यावेळ जी किंमत असेल त्या किंमतीवर संपत्ति–कर बसेल. ज्या ठिकाणीं बक्षिसाची रक्कम रोख दिली गेली असेल त्याठिकाणीं फारशी कठिणता उद्भवत नाहीं. कारण, जर अनें बला रु. १,००,००० बक्षिस दिले आणि त्यानें त्या रकमेचें एक मकान घेतलें, तरी त्या मकानाची किंमत रु. १,००,००० आहे असें समजलें जाईल. परंतु ज्या ठिकाणीं कांहीं जायदाद बक्षिस दिली गेली असेल त्या ठिकाणीं त्या जायदादीची दात्याच्या

मरतेसमयीं बाजारभावानें लागलेली किंमत कर बसविण्याकरितां विचारांत घेण्यांत येईल.

**सार्वजनिक उपयोगाकरितां केलेलें दान**

आतां आपण सार्वजनिक उपयोगाकरितां दिलेल्या दानाकडे वळूं. मरणापूर्वी अनेक लोक कांहीं दान करून त्या दानाचा उपयोग गोरगरिबांना व्हावा अशी अट टाकतात. अशा प्रकारचें दान मुख्यतः गोरगरिबांच्या मदतीकरितां, शिक्षणाकरितां, लोकांच्या औषधोपचाराकरितां किंवा इतर प्रकारच्या सार्वजनिक हिताकरितां केलेलें असतें, असें समजलें जाईल. त्याचप्रमाणें, कांहीं लोक धर्मशाळा बांधण्याकरितां दान करतात, ऐतिहासिक महत्त्वाच्या जागांची काळजी घेण्यासाठीं, लोकांच्या उपयोगाकरितां विहिरी बांधण्यासाठीं किंवा अन्नदान करण्याकरितां वगैरेहि कांहीं लोक दान करीत असतात. प्रश्न असा उद्‌भवतो कीं, अशा या सार्वजनिक कार्याकरितां केलेल्या दानाच्या रकमेवर देखील दात्याच्या मरणानंतर कर बसेल काय ? ज्याप्रमाणें खाजगी रीतीनें करून दिलेल्या बक्षिसाकरितां कायद्यानें २ वर्षांची मुदत टाकली आहे त्याचप्रमाणें सार्वजनिक उपयोगाकरितां केलेल्या दानाकरितां देखील कायद्यानें सहा महिन्यांची मुदत टाकली आहे. (कलम ९) सार्वजनिक उपयोगाकरितां केलेलें दान जर दात्याच्या मरणापूर्वी सहा महिन्यांच्या आंत केलें असेल म्हणजे दान केल्यापासून सहा महिन्यांच्या आंतच जर दाता मरण पावला असेल तर संपत्ति-कर बसवितांना हीं दानाची रक्कम किंवा दान केलेल्या मालमत्तेची किंमत मृत व्यक्तीच्या एकूण इस्टेटीचा भाग आहे असें समजलें जाईल व त्यावर संपत्ति-कर आकारण्यांत येईल.

**अपवाद**

बक्षिस किंवा दानाच्या बाबतींत कायद्यानें एक अपवाद केला आहे तो कलम ९ (२) मध्यें सांगितला आहे. तो असा कीं, लग्नकार्याप्रित्यर्थ किंवा मृतव्यक्तीच्या राहणीमानाप्रमाणें आणि त्याच्या लौकिकाला साजेल अशा रीतीनें केलेल्या खर्चाच्या रकमेवर संपत्ति-कर बसणार नाहीं. परंतु अशा प्रकारच्या खर्चाच्या बाबतींत जास्तींत जास्त रु. ५,००० ची सूट करास लागू असलेल्या इस्टेटींतून मिळूं शकेल. याचा अर्थ असा कीं, कलम ९ चें पोट-कलम (१) रु. ५,००० च्या मर्यादेपर्यंत केलेल्या लग्नकार्याप्रित्यर्थ बक्षिसाला किंवा दात्याच्या नेहमींच्या खर्चाला लागू होणार नाहीं. हा खर्च मृत व्यक्तीच्या सर्वसाधारण खर्चाचा भाग आहे असें मात्र सिद्ध करून द्यावें लागेल.

—न्यायबोध, जानेवारी, १९५५

---

**सिंधमध्यें जहागीरदारीचा शेवट**—सिंध सरकारनें राज्यांतील जुनी जहागीरदारीची पद्धत रद्द करण्याचें ठरविलें आहे. जहागीरदारांना नुकसानभरपाई देण्यांत येणार नाहीं. ह्या जमीन-धारणा-विषयक सुधारणांमुळें सुमारें १० लाख एकर जमीन भूमिहीन शेतकऱ्यांना वाटतां येईल आणि राज्य सरकारच्या तिजोरींत दरवर्षी १८ लाख रुपयांची भर पडेल.

**आतां मेजवानीचें बिल द्या**—पाकिस्तानचे माजी उद्योगमंत्री, खान अब्दुल कायूमखान, हे पेशावरला गेले असतां त्यांच्या एका चहात्यानें त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी दिली होती. ह्या मेजवानीचें मोठें बिल त्यांच्या यजमानानें आतां कायूमखान ह्यांच्याकडे पाठविलें आहे. पण खानसाहेब आतां मंत्रिपदावर नाहींत.


# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | | |
| भागीदारांतर्फे | रु. | ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. | ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. | १२,७०,२७,००० |

**१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



स्थापना सन १९३५ — रे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
(१९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली)

| | | |
|---|---|---|
| संकलिपत भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, (उपाध्यक्ष)
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., (मॅनेजिंग डायरेक्टर)
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

### कूर्गमधील वीज–निर्मितीचें धरण

कूर्ग सरकारनें बारापोल ह्या ठिकाणीं विजेच्या निर्मितीसाठीं एक धरण बांधण्याचें ठरविलें होतें. ह्या धरणाच्या योजनेच्या छाननीचें काम आतां पूर्ण झालें आहे. धरण बांधण्यासाठीं सुमारें १६ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारत सरकारच्या योजनासमितीपुढें ही योजना सध्यां विचारासाठीं आहे. बारापोल नदीच्या पात्राला बांध घालून १,८०,००० किलोवॅट विजेचें उत्पादन करतां येईल असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे. कूर्ग राज्याचे सुपरिंटेंडिंग एंजिनिअर श्री. एम्. कृष्णमूर्ति राव ह्यांनीं संपूर्ण योजनेचा आराखडा तयार केला आहे. योजनेसंबंधीं मत व्यक्त करतांना ते म्हणतात कीं, योजनेचा पहिला टप्पा पूर्ण होण्यास पांच वर्षांचा कालावधि लागेल. हा टप्पा पूर्ण झाल्यावर अंदाजें १,२३,००० किलोवॅट विजेचें उत्पादन होऊं लागेल. तथापि चौथ्या वर्षाच्या अखेर ३१,२५० किलोवॅट वीज उत्पन्न करण्याची यंत्रसामुग्रीच प्रत्यक्ष काम करूं लागेल. उरलेल्या विजेच्या उत्पादनाची यांत्रिक व्यवस्था पुढील म्हणजे पांचव्या वर्षाच्या अखेरीस पूर्ण होईल. धरणापासून उत्पन्न होणाऱ्या विजेचा पुरवठा कूर्ग राज्याला तर होईलच; पण मलबार आणि द. कॅनरा ह्या भागांनाहि धरणाची वीज पुरवता येईल. ह्या दोन्ही भागांत विजेच्या पुरवठ्याची अतिशय निकड आहे. विजेच्या उत्पादनाखेरीज पाणी–पुरवठ्याच्या दृष्टीनेंहि ही योजना महत्त्वाची आहे. मलबार भाग अन्नधान्याच्या दृष्टीनें तुटीचा आहे. त्यामधील ३०,००० एकर जमिनीला धरणामुळें पाणीपुरवठा होऊं लागेल.

---

**ब्रिटिश गायकाचा बाणेदारपणा**—मि. जॉनी डॅकवर्थ ह्या प्रसिद्ध नृत्य–गानपटूला दक्षिण आफ्रिकेंत दौरा काढण्यासाठीं आमंत्रण आलें होतें. दौऱ्यांत त्याला १०,००० पौंड मिळावयाचे होते. परंतु द. आफ्रिकन सरकारच्या वर्णीय पक्षपाताला त्याचा विरोध असल्यानें त्यानें आमंत्रणाचा स्वीकार केला नाहीं. त्याच्या कलापथकांत दोन नीग्रो कलावंत आहेत.

**गव्हाची आयात करावी लागली**—भारतामधील तांदूळ खाणाऱ्या लोकांनीं गहूं खाण्यास प्रारंभ केल्यामुळें भारत सरकारला १० लाख टन गहूं आयात करावा लागला, अशी माहिती दुय्यम अन्नमंत्री श्री. कृष्णाप्पा ह्यांनीं सांगितली. अन्नधान्यावर नियंत्रणें होतीं, त्यावेळीं मद्रास व कलकत्त्यासारख्या शहरांतूनहि ६ औंस गहू सक्तीनें देण्यांत येई. त्यामुळें आहारांत फरक पडल्याचें त्यांनीं सांगितलें.

**कलकत्त्यामधील बेकारी**—कलकत्ता शहराची लोकसंख्या सुमारें २५ लाख आहे. शहरांतील ३,७८,००० लोकांना कामधंद्याची जरूरी आहे. ८,५७,००० हजार लोकांना पूर्ण वेळ काम असणाऱ्या नोकऱ्या आहेत व त्यांतील ७५ टक्के लोकांचें मासिक उत्पन्न १०० रुपयांपेक्षा कमी आहे, १७ टक्के लोकांचें ९०० रुपयांपेक्षा कमी आहे व फक्त ३·५ टक्के लोकांचे दरमहा ३५० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न आहे.

**अलीगड येथील कुलपांचें उत्पादन**—अलीगड येथें भारतामधील कुलपें तयार करण्याचे मोठे कारखाने आहेत. कारखान्यांतून दरवर्षीं सुमारें ७५ लाख कुलुपें तयार करण्यांत येतात असा अंदाज अधिकृत रीत्या करण्यांत आला आहे. कारखान्यांमुळें ३२,००० लोकांना रोजगार मिळत आहे. अलीगड येथें तयार झालेलीं कुलुपें चीन, ब्रह्मदेश, सिलोन, आफ्रिका इत्यादि देशांकडे निर्यात केलीं जातात.


## सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील
पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.